आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ सप्टेंबर २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधल्या संविधान मंदिराचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते लोकार्पण / राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा असल्याचं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन
- सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- अरविंद केजरीवाल दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार
- महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर जुनी पेन्शन योजना लागू करण्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं आश्वासन
- देशातल्या प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या दूरदर्शनची ६५ वी वर्षपूर्ती
  **आणि**
- बेल्जियन इंटरनॅशनल २०२४ स्पर्धेत भारताची बॅडमिंटनपटू अनमोल खरब हिची एकेरीतल्या अजिंक्यपदाला गवसणी

**<><><><><>**

राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा, तर संसद ही राज्यघटनेची रक्षक असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. ते आज राज्यभरातल्या ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरदृश्य पद्धतीनं केल्यानंतर बोलत होते. भारतीय राज्यघटना सर्वार्थानं वैशिष्ट्यपूर्ण असून राज्यघटनेचा गाभा आपण समजून घेणं गरजेचं आहे. राज्यघटना हा मिरवण्याचा नव्हे तर वाचून, समजून घेण्याचा ग्रंथ आहे, असं ते म्हणाले….

**होल्ड--बाईट--उपराष्ट्रपती**

राज्यघटनेनं दिलेल्या आरक्षणाला काही लोक विरोध करत आहेत, मात्र आरक्षण हा भारताचा, राज्यघटनेचा आत्मा आहे. सामाजिक न्याय हा आरक्षणाचा आधार असून वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देणं गरजेचं आहे, असं त्यांनी सांगितलं.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे स्वयंउद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा आणि इतर यावेळी उपस्थित होते.

यावेळी 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि त्यांच्या पत्नी सुदेश धनखड यांनी वृक्षारोपण केलं.

**<><><><><>**

नागपुरातल्या रामदेव बाबा विद्यापीठात आज डिजिटल टॉवरचं उद्घाटनही धनखड यांनी केलं. विद्यार्थ्यांनी केवळ सरकारी नोकऱ्यांमध्ये नव्हे, तर तंत्रज्ञानातल्या संधींचा शोध घेण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. या १२ मजली डिजिटल टॉवरमध्ये संगणक, विज्ञान, आणि अभियांत्रिकीसाठी आधुनिक तंत्रज्ञानानं सुसज्ज असलेल्या डिजिटल वर्गांचा सामावेश आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सबका साथ सबका विश्वास या मंत्रानं देशात विचारधारा आणि प्राधान्यक्रमात आमूलाग्र बदल केला असून गरीब, आदिवासी, दलित, वंचित, मागासवर्गीय, महिला, युवावर्ग आणि शेतकऱ्यांना प्राधान्य दिलं जात आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आपल्या झारखंड दौऱ्याच्या पहिल्या

टप्प्यात आज ६ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी ते बोलत होते. या कार्य्रक्रमात प्रधानमंत्र्यांनी ६६० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि राष्ट्रार्पणही केलं.

केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांअंतर्गत बांधलेल्या देशभरातल्या दोन कोटी नवीन घरांच्या वाटपाचा प्रारंभ आणि ४६ हजार लाभार्थ्यांच्या गृहप्रवेशही सोहळाही या कार्यक्रमात झाला. प्रधान मंत्री आवास योजना- ग्रामीणच्या २० हजार लाभार्थ्यांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आवास मंजुरी पत्रांचं वाटपही करण्यात आलं.

प्रधानमंत्री उद्या अहमदाबाद मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याच्या अहमदाबाद ते गांधीनगर गाडीला हिरवा झेंडा दाखवतील. ते गांधीनगरमधे चौथ्या पुनर्नविकरणीय उर्जा परिषदेचं उद्धाटन करतील, तसंच प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधतील. अहमदाबादमधे ८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांचा प्रारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. **<><><><><>**

संथाल परगणा आणि कोल्हान भागातली लोकसंख्येची स्थिती झपाट्याने बदलत आहे, इथल्या आदिवासींची लोकसंख्या कमी होत आहे तर घुसखोर वाढत आहेत, या भागाला रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांचा धोका आहे अशी चिंता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. ते आज जमशेदपूर इथं आयोजित परिवर्तन महामेळाव्याला संबोधित करताना बोलत होते. झारखंड मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस व्होट बँकेचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात भाजपाचीच सत्ता येईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी येत्या दोन दिवसांमध्ये मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा आज केली. दारू घोटाळा प्रकरणी केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं दोन दिवसापूर्वी जामीन मंजूर केला होता. त्यानंतर तिहार कारागृहातुन बाहेर आलेल्या केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसांत आम आदमी पार्टीच्या सर्व आमदारांची बैठक घेऊन त्यात नव्या मुख्यमंत्र्याचं नाव निश्चित केलं जाईल, असं केजरीवाल म्हणाले. पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या दिल्लीच्या विधानसभा निवडणुका यंदा नोव्हेंबर महिन्यात घ्याव्यात अशी मागणी केजरीवाल यांनी केली आहे.

अरविंद केजरीवाल यांची राजीनाम्याची घोषणा ही फक्त प्रसिद्धीसाठी असल्याची टीका भाजपाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केली आहे. तर केजरीवाल यांचे प्रामाणिकपणाचे दावे पोकळ असल्याचा आरोप दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव यांनी केला आहे.

**<><><><><>**

ओमानमध्ये पारंपरिक आणि साध्या पद्धतीनं गणेशोत्सव साजरा होतो. या विषयी आकाशवाणीच्या श्रोत्यांसाठी मस्कतमध्ये राहणारे गणेश घुगे यांनी माहिती दिली…

**होल्ड- गणेश घुगे, ओमान**

**<><><><><>**

महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर जुनी पेन्शन योजना लागू केली जाईल, असं आश्वासन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलं आहे. शिर्डी इथं पेन्शन राज्य महाअधिवेशनात बोलत होते.

या अधिवेशनाला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आणि इतर नेते उपस्थित होते. पटोले यांनीही त्यांच्या भाषणात हे आश्वासन दिलं. काँग्रेसचं सरकार ज्या राज्यात आहे तिथं जुनी पेन्शन योजना लागू केली आहे, असं ते म्हणाले.

राज्यात अडीच लाख सरकारी पदं रिक्त आहेत पण महायुती सरकार ती पदं भरत नाही. मविआचं सरकार आल्यानंतर ही रिक्त पदंही भरली जातील, असं पटोले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रातलं सरकार आणि राज्यातलं महायुतीचं सरकार हे शेतकरी विरोधी सरकार आहे, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज धुळे जिल्ह्याल्या शिंदखेडा इथं आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. सरकारला  शेतकऱ्यांबद्दल आस्था नाही त्याचप्रमाणं राज्यात महिला सुरक्षित नाहीत, त्यामुळे विधानसभा निवडणुकीत हे सरकार हटवून आपल्या विचारांचं सरकार आणणं ही जनतेची जबाबदारी आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

देशातील प्रसारणाचा महत्त्वपूर्ण भाग असलेलं दूरदर्शन आज आपली गौरवशाली ६५ वर्षे पूर्ण करत आहे. १५  सप्टेंबर १९५९ रोजी स्थापन झालेल्या दूरदर्शनने भारताच्या प्रसारण युगाची सुरुवात केली. तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी त्या दिवशी दूरदर्शनच्या पहिल्या प्रसारणाचं उद्घाटन केलं होतं. १९७५  पर्यंत दूरदर्शन आकाशवाणीचाच घटक होता. १ एप्रिल १९७६  रोजी, त्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या एका स्वतंत्र विभागात रूपांतर झालं. सरकारचं स्वायत्त सार्वजनिक सेवा प्रसारक असलेलं दूरदर्शन प्रसार भारतीच्या

दोन विभागांपैकी एक आहे. आज, दूरदर्शन आपल्या स्टुडिओ आणि ट्रान्समीटरच्या विशाल जाळ्यासह देशातली सर्वात मोठी प्रसारण संस्था आहे. दूरचित्रवाणी, ऑनलाइन आणि मोबाइल सेवेबरोबरच दूरदर्शन – महानगर, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये, ३५ उपग्रह वाहिनी चालवणाऱ्या नेटवर्कमध्ये दूरदर्शनचा विस्तार झाला असून यात २४ तास चालणार्या ६ राष्ट्रीय वाहिन्या आणि २२ प्रादेशिक वाहिन्या आहेत.

कृष्णधवल दूरचित्रवाणीच्या काळापासून ते डिजिटल आणि सॅटेलाइट प्रसारणाच्या सध्याच्या युगापर्यंत, दूरदर्शननं आपल्या विविध स्तरांमधल्या प्रेक्षकांची बदलती अभिरुची आणि प्राधान्यक्रम पूर्ण करण्यासाठी स्वतःचा सातत्त्यानं विकास केला आहे.

**<><><><><>**

भारताची उदयोन्मुख बॅडमिंटनपटू अनमोल खरब हिनं बेल्जियन इंटरनॅशनल २०२४ स्पर्धेत आपल्या कारकीर्दीतल्या पहिल्यावहिल्या एकेरी अजिंक्यपदाला गवसणी घातली. १७ वर्षांच्या अनमोल हिनं डेन्मार्कच्या ॲमेलिया शुल्ज हिच्यावर २४-२२, १२-२१, २१-१० अशी मात केली.

**<><><><><>**

देशभरात उद्या साजऱ्या होणाऱ्या मिलाद उन नबीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुस्लीम समुदायाला शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषिद मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं. त्यांनी समाजात समानता आणि सौहार्द वाढावा यावर भर दिला तसंच, दया, मानवतेचा प्रसार केला, असं सांगून राष्ट्रपतींनी मुस्लीम समुदायाला पवित्र कुराणातली शिकवण आत्मसात करण्याचं आवाहन केलं.